महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती
जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, श्रीकृष्णपेठ, अमरावती, महाराष्ट्र - ४४४ ६०१
वेबसाईट : gmcamravati.org फोन नं.0721-2993171

जा.क्र.शावैमअ/वि.वे./थेट मुलाखत/व.नि./ता.नि./ 1390 /२५ दिनांक : 09/01/२०२५

# जाहिरात

विषय : वरिष्ठ निवासी (सेवा) संवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने १२० दिवसांकरीता भरणे करीता थेट मुलाखत आयोजित करण्याबाबत...

संदर्भ : शासन निर्णय क्र:- पदनि-२०२३/प्र.क्र.१८६/२३ वैसेवा-२ दिनांक : ०६ मार्च, २०२४.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती या संस्थेतील जाहिरातीमध्ये नमुद विषयातील वरिष्ठ निवासी (सेवा) या संवर्गातील रिक्त पदे शासन/संचालनालयामार्फत/बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत स्थानिक निवड मंडळा मार्फत निव्वळ १२० दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता खालीलप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर पदाकरीता थेट मुलाखत दिनांक १६/०१/२०२५ रोजी दुपारी ११.०० वा. ते ०१.०० वा. पर्यंत मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे दालनामध्ये आयोजित करण्यात येत आहे. सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना संस्थेचे संकेतस्थळ gmcamravati.org वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तरी पात्र उमेदवारांनी वरिष्ठ निवासी (सेवा) पदाकरीता प्रसिध्द जाहीरातीचे अवलोकन करावे व संकेतस्थळावरुन सदरचा अर्ज डाऊनलोड करुन, अर्ज परिपुर्ण भरुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट साक्षांकीत छायाप्रतीसह आपले परिपुर्ण अर्ज दिनांक १४/०१/२०२५ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत द्विप्रतीत या कार्यालयास सादर करण्यात यावे. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(डॉ.किशोर इंगोले)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.

प्रत,
१. संस्थेच्या संकेतस्थळ gmcamravati.org वर प्रसिध्द करणेकरीता.
२. नोटीस बोर्ड - महाविद्यालय/रुग्णालय/ग्रंथालय/विभाग........

प्रत माहितीस सविनय सादर,
१) मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई
२) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

वरिष्ठ निवासी (सेवा) संवर्गातील रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | शरिररचनाशास्त्र | ०३ | राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे नियमानुसार |
| २ | शरिरक्रियाशास्त्र | ०३ | |
| ३ | जिवरसायनशास्त्र | ०३ | |
| ४ | न्यायवैद्यशास्त्र | ०१ | |
| ५ | जनऔषधवैद्यशास्त्र | ०१ | |
| ६ | औषधवैद्यकशास्त्र | ०३ | |
| ७ | शल्यचिकीत्साशास्त्र | ०३ | |
| ८ | कान, नाक, घसा | ०१ | |
| ९ | नेत्रशल्य चिकीत्साशास्त्र | ०१ | |
| १० | स्त्रिरोग व प्रसुतीशास्त्र | ०२ | |
| ११ | बधिरीकरणशास्त्र | ०१ | |
| १२ | क्ष -किरणशास्त्र | ०२ | |
| १३ | आपातकालीन औषवैद्यशास्त्र | ०५ | |
| १४ | औषधशास्त्र | ०१ | |
| १५ | बालरोगचिकीत्साशास्त्र | ०१ | |
| १६ | क्षय व उररोगशास्त्र | ०१ | |
| | एकुण | ३२ | |

अ) शैक्षणिक व इतर अर्हता :

| अ.क्र. | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|
| १ | मुळ अर्ज |
| २ | अधिवास/राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र |
| ३ | एम.बी.बी.एस.प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्र |
| ४ | पदवी प्रमाणपत्र |
| ५ | एम.डी/एम.एस/डीएनबी प्रमाणपत्र |
| ६ | अद्ययावत एम.एम.सी/एन.एम.सी.नोंदणी प्रमाणपत्र |
| ७ | बंधपत्रित असल्याचे प्रमाणपत्र (लागु असल्यास) |
| ८ | पार्सींग सर्टिफीकेट |
| ९ | अनुभव प्रमाणपत्र |
| १० | जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (लागु असल्यास) |
| ११ | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागु असल्यास) |
| १२ | आधार कार्ड/पॅन कार्ड/मतदान कार्ड |

ब) वयोमर्यादा : ४५ वर्ष

क) वेतनश्रेणी : विद्यावेतन / ठोक मानधन नियमानुसार

(पुढील पानावर)

**इ) जाहिरातीमध्ये बदल /दुरुस्ती /रदद करण्याचा अधिकार.**

**या जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात उदा.अटी/शर्ती/नियम/पदसंख्या कमी अथवा जास्त करणे/जाहीरात रदद करणे/अंशत: बदल करणे इत्यादींचा अधिकारी अधिष्ठाता/स्थानिक निवड मंडळ यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे या बाबतचे अंतिम निर्णय व अधिकार अधिष्ठाता यांना असतील.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

१. वरील दर्शविलेल्या पदसंख्येत बदल अथवा कमी जास्त होऊ शकते.

२. वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन त्यास राज्य शासनाचा कर्मचारी म्हणता येणार नाही.

३. उमेदवारांना मुलाखतीच्या ठिकाणी स्वत: स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

४. वरिष्ठ निवासी पदावर बंधपत्रित उमेदवारांचीच निवड करण्यात येईल. बंधपत्रित उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त राहीलेल्या पदावर अबंधपत्रित उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

५. निवड झालेल्या उमेदवाराने २५०००/- एवढी रकमेचा धनादेश अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती यांचे नावे अनामत रक्कम म्हणुन रोख विभागाकडे सादर करावे लागेल व त्यासंबंधीच्या पावतीची नोंद आवासी निवासी विभागाकडे करावी.

६. अनामत रक्कम पदाचा पूर्ण कालावधी संपुष्ठात आल्यावर अथवा पद सोडण्याबाबतची एक महीना पूर्व सूचना दिल्यानंतर परत करण्यात येईल. पद सोडावयाचे असल्यास त्याबाबत एक महिना अगोदर पद सोडत असल्याची पुर्वसुचना न दिल्यास सदर अनामत रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

७. अंतिम निवड झालेल्या/रुजू झालेल्या उमेदवारास कोणत्याही खाजगी/मंडळ/निमशासकीय संस्थेत/कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारची नोकरी स्विकारता येणार नाही किंवा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. जर असे निदर्शनास आले तर सदर उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८. निवड झालेल्या उमेदवाराने विभागप्रमुखांच्या निर्देशानुसार २४ तास रुग्णसेवेकरीता उपस्थित असणे बंधनकारक आहे. उमेदवार रुग्णसेवेमध्ये हलगर्जीपणा करत असल्याचे संस्थाप्रमुख अथवा विभागप्रमुख यांचे निदर्शनास आल्यास सदर उमेदवाराची सेवा तात्काळ कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

९. प्रशासकीय किंवा काही कारणास्तव निवड (भरती प्रक्रिया) कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर थांबविण्याचा किंवा रदद करण्याचा किंवा बदल करण्याचा संपुर्ण अधिकारी अधिष्ठाता/स्थानिक निवड मंडळास राहील.

५. इतर संस्थेतील कार्यरत उमेदवारांनी अर्जासोबत संबंधीत संस्था प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

६.सदर जाहिरातीमधील नमुद पदे ही तात्पुरत्या तसेच पुर्णत: कंत्राटी स्वरुपाची असुन भविष्यात सउदर पदावर नियमीत करण्याकरीता कोणताही दावा करता येणार नाही.

७. वरिष्ठ निवासी या पदाकरीता शासकीय निवासस्थान उपलब्ध नाही.

८. मुलाखतीचे ठिकाण : अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.

९. मुलाखतीचा दिनांक व वेळ : दिनांक १६/०१/२०२५ सकाळी ११.०० ते ०१.०० वा. पर्यंत राहील.

**टिप :** मुलाखतीस वरील दिनांकास व विहीत वेळेमध्ये स्वत: उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

( डॉ किशोर इंगोले)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती

ई-मेल:- gmcamravati@gmail.com

---

| | | | |
|---|---|---|---|
| कार्यालयीन कामकाजाकरीता | | | स्वाक्षरी |
| अर्ज क्रमांक | | अर्ज दिनांक | |
| | | अर्ज प्राप्त दिनांक | |

## स्थानिक निवड मंडळ

## वरिष्ठ निवासी (सेवा) अर्जाचा नमुना

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती.

फोटो

| | | |
|---|---|---|
| अर्जातील पदाचे नाव - | | विभागाचे नाव- |
| उमेदवाराचे संपुर्ण नाव - | | |
| संपूर्ण पत्ता - | | |
| मोबाईल क्र. | पॅन क्र. | आधार क्र. |
| ई-मेल- | | |

| जन्म दिनांक | दिनांक | महिना | वर्ष | मुलाखतिच्या दिवशीचे वय | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

जन्म दिनांकाच्या पुराव्यासाठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे

| जात प्रवर्ग | SC | ST | VJ | NT १ | NT २ | NT३ | SBC | OBC | EWS | SEBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योग्य ठिकाणी टिकमार्क करावी | | | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| अर्जासोबत आधारकार्डची छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| अर्जासोबत रहिवासी प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्राची छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| अर्जासोबत चालु आर्थिक वर्षाची दिनांक ३१ मार्च पर्यंत नॉन क्रिमीलीयर लागु असल्यास प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जदार इतरत्र नोकरीत आहे काय ? | होय | नाही |
| शासकीय नोकरीत असल्यास तपशील देऊन संबंधीत संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.<br>अनुभव असल्यास, अनुभव प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. अथवा तत्सम पदवी गुणपत्रीकाच्या छायांकीत प्रती जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत पदव्युत्तर पदवी/पदवीका परिक्षेचे गुणपत्रीकांचे छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत एम.बी.बी.एस. अथवा तत्सम पदव्यांची प्रयत्नांचे प्रमाणपत्र (Attempt Certificate) जोडावी | होय | नाही |
| आंतरवासीता पुर्णत्व प्रमाणपत्र छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अर्जदार बंधपत्रीत असल्यास तसे प्रमाणपत्र छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अर्जासोबत पदवी,पदव्युत्तर पदवी व पदवीका यांचे एम.एम.सी/ एन.एम.सी/एम.सी.आय/एम.डी.सी/डी.सी.आय चे कायम नोंदणी वैध प्रमाणपत्र व नुतणीकरण प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत पदव्युत्तर पदवी व पदवीका यांचे प्रमाणपत्र छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| सहाय्यक प्राध्यापक पदासाठी अर्जासोबत वरिष्ठ निवासी/टयुटर पोस्ट पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |

| शैक्षणीक अर्हता | उत्तीर्ण केलेली परीक्षा | प्राप्त गुण | पैकी गुण | टक्केवारी | लागलेले प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | पदवीगुण | | | | |
| २ | पदव्युत्तर पदवी गुण | | | | |
| ३ | पदवीका गुण | | | | |

| | | |
|---|---|---|
| वरिष्ठ निवासीसाठी अर्ज असल्यास मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी/ पदविका उत्तीर्ण केलेली असावी पदविका असल्यास ६ महिन्याच्या कालावधीचे दोन पोस्ट पुर्ण करणे आवश्यक एम.बी.बी.एस पदवी असल्यास सदर विषयांस ६ पोस्ट पुर्ण करणे आवश्यक | होय | नाही |
| अनुभव प्रमाणपत्र | होय | नाही |
| अर्जदार शासकीय संस्थेत कार्यरत असल्यास विषयांकित प्राध्यापक व विभाग प्रमुखांची शेरा | | |

**महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ मधील नमुना-अ (नियम ४ पहा)**

मी, श्री/श्रीमती/कुमारी/डॉ..______________________श्री.______________________________
यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय____ वर्ष, राहणार पुढे पुढील प्रमाणे असे जाहीर करते/करतो की,मी______________ या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. आज मला (संख्या)____ इतके मुले हयात आहेत. त्यापैकी दि.२८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या______ इतकी आहे. हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अपात्र ठरविण्यात येईल याची मला जाणीव आहे.

अर्जात नमुद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यायर पुर्वसुचना न देता रदद करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

**अर्जदाराची स्वाक्षरी दिनांक -**

टिप :-

१. अर्जदाराने अर्जा मधील सर्व माहिती अचुक भरणे अनिवार्य आहे. अर्थात माहिती अपूर्ण असल्यास सदरील अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
२. अर्जदाराने अर्जासोबत छायांकित (SELF ATTESTED) सत्यप्रती जोडलेल्या असाव्यात.
३. अर्जदाराने प्रत्येक पदासाठी/विषयासाठी स्वतंत्र अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित सहसादर कराव्या.
४. अर्जदाराने अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर विहीत जागेवर लावणे अनिवार्य आहे.
५. अर्जदाराने संस्थेत कार्यरत असल्यास आपला अर्जसंबधित विभागप्रमुख यांचे मार्फत जमा करणे कार्यालयीन वेळेत अनिवार्य आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| तपासणी समितीची स्वाक्षरी | | | |
| | **अधक्ष** | **सदस्य (विषयतज्ञ)** | **सदस्य** |